आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
३१ ऑक्टोबर २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी नागरिकांनी संघटित होऊन स्वतःला समर्पित करण्याचं प्रधानमंत्र्यांचं आवाहन

- सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतिनिमित्त मान्यवरांची आदरांजली, राज्यासह देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन

- 'केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदकं' देशभरातल्या १ हजार ४६६ पोलिसांना जाहीर, राज्यातल्या ९ जणांचा पदक विजेत्यांमध्ये समावेश

**आणि**

- ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या टी-२० क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात भारतीय फलंदाजी गडगडली

**<><><><><>**

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी आणि देशाच्या प्रगतीसाठी नागरिकांनी संघटित होऊन स्वतःला समर्पित करावं, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त गुजरातमधल्या एकता नगर इथं आयोजित राष्ट्रीय एकता दिवस समारंभात ते बोलत होते. देश कमकुवत करणाऱ्या सर्व विचार किंवा कृती प्रत्येक नागरिकानं नाकारायला हवी, ही काळाची गरज असल्याची ग्वाही प्रधानमंत्र्यांनी दिली. स्वातंत्र्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांनी 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या दृष्टिकोनाला मूर्त रूप देत ५५०हून अधिक संस्थानं एकत्र करून अशक्य वाटणारं काम साध्य केलं, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. देशभरात सुरू असलेल्या एकता दौडमध्ये कोट्यवधी भारतीयांचा उत्साह पाहून प्रधानमंत्री म्हणाले…

***होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री***

प्रधानमंत्री मोदी यांनी दिवसाची सुरुवात स्टॅच्यू ऑफ युनिटीला पुष्पांजली अर्पण करून केली. यावेळी त्यांनी एकता दिनाची शपथ घेतली, तसंच भव्य एकता दिन संचलनाचं निरीक्षण केलं. या संचलनामध्ये बीएसएफ, सीआरपीएफ आणि विविध राज्य पोलीस

दलांच्या तुकड्या सहभागी झाल्या होत्या. या संचलनात 'विविधतून एकता' या संकल्पनेवर दहा चित्ररथही सहभागी झाले होते. त्यात महाराष्ट्राच्या चित्ररथाचाही समावेश होता.

<><><><><>

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त मान्यवरांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. सरदार पटेल यांनी आपल्या अढळ संकल्प, अदम्य धैर्य आणि कुशल नेतृत्वानं राष्ट्राला एकत्र आणण्याचं ऐतिहासिक कार्य केलं, अशा शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सरदार पटेल यांना आदरांजली वाहिली. सरदार पटेल यांच्या दृढनिश्चय आणि दूरदृष्टीनं भारताला लोकशाही प्रजासत्ताकात एकत्र आणलं आहे. संस्थानांचं विलिनीकरण आणि एकतेसाठी पटेल यांचं अमूल्य योगदान प्रेरणादायी आहे, अशा शब्दात उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी पटेल यांना आदरांजली वाहिली.सरदार वल्लभभाई पटेल हे देशाच्या एकात्मतेमागची प्रेरक शक्ती होते. देशाची अखंडता, सुशासन आणि सार्वजनिक सेवेसाठी पटेल यांची अढळ वचनबद्धता पुढच्या प्रत्येक पिढीला प्रेरणा देत राहील, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीदिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदरांजली वाहिली आहे. तसंच राष्ट्रीय एकता दिनाच्या त्यांनी राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

सरदार वल्लभभाई पटेल या थोर व्यक्तिमत्वाला आणि त्यांच्या महान विचारांना आज त्यांच्या जयंतीदिनी सविनय प्रणाम, या शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आदरांजली वाहिली.

पटेल यांनी राष्ट्रीय एकात्मकता अखंडतंते साठी अथक प्रयत्न केले असून देशाचा पाया रचला, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या कार्याला  वंदन केलं आहे.

<><><><><>

भारतीय स्वातंत्र्यानंतर देशाला एकसंध राखण्यात आणि आजच्या भारताच्या निर्मितीत सरदार वल्लभभाई पटेल यांचं खूप मोठं योगदान असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले. सरदार पटेल यांच्या दीडशेव्या जयंतिनिमित्त नवी दिल्लीत आयोजित रन फॉर यूनिटीला त्यांनी आज प्रारंभ केला, त्यावेळी ते बोलत होते.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त राज्यात सर्वत्र एकता दौड, पदयात्रासह विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. मंत्रालयात मुख्य सचिव राजेश कुमार यांनी पटेल यांच्या प्रतिमेला पुष्पहार करून अभिवादन केलं. तसंच दिवंगत माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेलाही पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**बुलढाणा जिल्ह्यात** मलकापूर इथल्या एकता दौडला केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या नेतृत्वात सुरुवात झाली. **परभणी शहरात** आज भाजपच्या वतीनं एकता दौड आयोजित केली होती. जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डिकर यांनी गोमातेची पूजा करून एकता दौडचा प्रारंभ केला. **परभणी** पोलिसांच्या वतीनं कृषी विद्यापीठ गेट ते पोलीस कार्यालय अशी दौड घेण्यात आली. **नंदुरबार** शहरातही एकता दौडचं आयोजन करण्यात आलं होतं. **हिंगोली** पोलिसांनीही एकता दौडचं आयोजन करून एकतेचा संदेश दिला. **यवतमाळमध्ये** क्रीडा मंत्रालय, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, राष्ट्रीय सेवा योजना, एनसीसी यांनी एकत्रितपणे युनिटी मार्चचं आयोजन केलं होतं. **छत्रपती संभाजीनगर** इथे एकता पदयात्रा आयोजित करण्यात आली होती. तिचा समारोप राज्याचे इतर मागासवर्ग मंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीत झाला. **नांदेड, सोलापूर, धुळे** जिल्ह्यातही तसंच **नवी मुंबईत बेलापूर** इथं एकता दौडसह विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

**<><><><><>**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दिली जाणारी ‘केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदकं’ देशभरातल्या १ हजार ४६६ जणांना जाहीर झाली आहेत. कारवाई, तपास, गुप्तचर यंत्रणा आणि न्यायवैद्यक शास्त्र या चार क्षेत्रांमध्ये उत्तम कामगिरी करणाऱ्या विविध राज्यं, केंद्रशासित प्रदेश, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल, केंद्रीय पोलीस यंत्रणांच्या कर्मचाऱ्यांना हा पुरस्कार दिला जातो. यंदा हा पुरस्कार मिळवणाऱ्यांमध्ये राज्यातल्या नऊ जणांचा समावेश आहे. तपास या विभागात पोलीस उपनिरीक्षक भगवान नारोडे, पल्लवी चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी गणपत पिंगळे, किशोर काळे, शर्मिष्ठा वालावलकर, सहायक पोलीस निरीक्षक रूपाली पोळ, श्रवण दाठ आणि विवेक पाटील यांना, तर न्यायवैद्यकशात्र विभागात अ श्रेणीचे उपसंचालक संदीप चेट्टी यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक जाहीर झालं आहे.

<><><><><>

भारताच्या माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांची आज पुण्यतिथी आहे. यानिमित्त देशभरातून त्यांना आदरांजली वाहिली जात आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी आज इंदिरा गांधींच्या 'शक्तिस्थळ' या समाधीस्थळी जाऊन त्यांना श्रद्धांजली वाहिली.

<><><><><>

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतला दुसरा सामना आज मेलबर्न इथं सुरू आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आणि भारताला फलंदाजीसाठी पाचारण केलं. मात्र, भारतीय संघाची फलंदाजी चांगलीच गडगडली.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या १५  षटकात ५ बाद ९८ धावा झाल्या होत्या.

मालिकेतला पहिला सामना पावसाच्या व्यत्ययामुळे रद्द करावा लागला होता. त्यापूर्वीची एकदिवसीय सामन्यांची मालिका यजमान ऑस्ट्रेलियानं २-१ अशी जिंकली होती.

<><><><><>

भारताच्या महिला क्रिकेट संघानं आयसीसी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. नवी मुंबईत काल झालेल्या थरारक उपांत्य सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियावर ५ फलंदाज राखून मात केली. ऑस्ट्रेलियानं दिलेलं ३३९ धावांचं लक्ष्य भारताच्या संघानं ५ फलंदाजांच्या मोबदल्यात ९ चेंडू राखून पूर्ण केलं. जेमीमा रॉडरिग्जच्या नाबाद १२७ आणि हरमनप्रीत कौर हिच्या ८९ धावांच्या खेळीच्या जोरावर ऑस्ट्रेलियानं दिलेलं मोठं लक्ष्य भारताला पार करता आलं.

//<><><><><>//